जा. क्र. प्रा./प्रा. शि/मा. तु./पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
यांचे कार्यालय.
दिनांक :- १३/१२/९४

प्रति,

~~मुख्याध्यापक~~/ मुख्याध्यापिका,

पैसाफंड प्राथमिक शाळा
विष्णुपुरी तळेगाव

विषय : – सन १९९४–९५ या व त्यापुढील शैक्षणिक वर्षासाठी अनुदानित प्राथमिक शाळांतील शिक्षक संख्या व इयत्तानिहाय तुकड्या मान्यता...

वरील विषयासंदर्भात कळविण्यात येते की, आपल्या शाळेची सन १९९४–९५ या शैक्षणिक वर्षातील दिनांक ३० सप्टेंबर १९९४ ची इयत्ता निहाय विद्यार्थी पटसंख्या व उपस्थिती आणि प्रशासन अधिकारी/शिक्षण अधिकारी यांनी मंजूर केलेल्या शिक्षक पदांची संख्या या दोन बाबी विचारात घेऊन आपल्या शाळेस सन १९९४–९५ या शैक्षणिक वर्षासाठी अनुदान तत्वावर खालील प्रमाणे इयत्तानिहाय तुकड्यांना मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार इयत्तानिहाय व तुकडीनिहाय अध्यापन कार्य होणे आवश्यक आहे. शाळेत मान्य तुकड्यापेक्षा कमी संख्येने तुकड्या आढळून आल्यास कमी असणाऱ्या तुकड्यांच्या संख्येइतक्या शिक्षकांची मान्यता काढून घेतली जाईल.

| इयत्ता | विद्यार्थी पटसंख्या | उपस्थिती | मंजूर तुकड्यांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ ली | १५८ | १५६ | 2 | |
| २ री | १५५ | १५३ | 2 | |
| ३ री | १५१ | १४९ | 2 | |
| ४ थी | १३५ | १३३ | 2 | |
| ५ वी | | | | |
| ६ वी | निरंक | | | |
| ७ वी | | | | |
| एकूण | ५९९ | ५९१ | ०८ | |

...२/-

वरील प्रमाणे इयत्ता निहाय विद्यार्थी पटसंख्या/उपस्थिती व

तुकड्यांची संख्या यानुसार आपल्या शाळेस सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षासाठी

खालीलप्रमाणे शिक्षक पदांना मान्यता देण्यात येत आहे.

| अ. नं. | पदाचे नांव | मंजूर संख्या |
|---|---|---|
| १. | वरिष्ठ मुख्याध्यापक – | 01 |
| २. | सहा. शिक्षक – | 08 |
| ३. | पदवीधर शिक्षक – | — |
| | एकूण मान्य शिक्षक संख्या – | 09 |

मुख्याध्यापकास प्रत्येक आठवड्यात किमान १२ तासिकाचे प्रत्यक्ष अध्यापन व १२ तासिकाचे पाठनिरीक्षण अनिवार्य राहील.

आपल्या शाळेसाठी वर नमूद केल्याप्रमाणे सर्व वर्गाच्या मिळून एकूण 08 (आठ) तुकड्या व 9 (नऊ) शिक्षक संख्या मंजूर केली असून यापुढे यावर्षी अगर त्यापुढील कोणत्याही वर्षी जादा तुकडी अगर जादा शिक्षकास मंजुरी दिली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. पुढील अगर त्यानंतरच्या एखाद्या वर्षी इ. २ री ते ७ वी पर्यंतच्या एखाद्या वर्गात नैसर्गिक वाढीमुळे जादा तुकडीची आवश्यकता भासत असेल तर इ. १ ली अगर अन्य वर्गाच्या मंजूर तुकड्यातील तुकडी कमी करुन शाळांतर्गत समायोजनाने संबंधित वर्गात तुकडी उपलब्ध करुन देता येईल. त्याबाबतचा आवश्यक तसा प्रस्ताव शिक्षणाधिकारी [प्राथमिक]/ प्रशासन अधिकारी यांचेकडे सादर करुन त्यास मान्यता घ्यावी.

१.५ कि.मी. अंतरात अन्य कोणतीही प्राथ. शाळा [जि.प. अगर खाजगी] नसेल तर मात्र पटसंख्या वाढीमुळे जादा तुकडी आवश्यक असेल तर प्रशासन अधिकारी/ शिक्षण अधिकारी [प्राथ] यांचेमार्फत मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करता येईल. तथापि पूर्व मंजूरीशिवाय कोणत्याही परिस्थितीत नवीन तुकडी सुरु करु नये अगर त्यावर शिक्षकाची नेमणूक करु नये. तसेच शाळेने आपल्या अधिकारात इ. १ ली च्या प्रत्येक तुकडीत ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नयेत. शिक्षणाधिकारी [प्राथ] अगर प्रशासन अधिकारी यांचे पूर्व मंजूरीने ही संख्या ६० पर्यंत वाढविता येईल.

वरील सूचनांचे आपण काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा अनुदान बंद अगर शाळेची मान्यता काढून घेणे अशी कारवाई खात्याकडून केली जाईल याची नोंद घ्यावी.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे – १.

...३/-

Scanned with ACE Scanner